# प्रभु तरुण

| वर्ष ५५ | अंक ०१ | मुंबई | १६ सप्टेंबर, २०२१ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


**कृतज्ञ स्मरण**



**श्री. सुहास विष्णुपंत कोठारे**

विनोबा भावे यांचे एक वाक्य आहे - 'जीवन हा 'कर्तरी' प्रयोग नाही. तो 'कर्मणी' प्रयोग आहे. याअर्थी की आपण सतत कर्म करीत रहायचे. त्यानुसार आपल्याला हवे तसे अपेक्षित जीवन लाभतेच असे नाही. जन्म, मृत्यू नेहमीच 'त्याच्या' (-देवाच्या) हातात असतो. तो कर्ता / धर्ता म्हणून आपले जीवन आपण म्हणू तसे घडणारे नाही; 'कर्तरी' नाही. खरेच आहे ते.

हे माणसांच्या बाबतीत खरे आहे. पण एखाद्या द्रष्ट्या माणसाने त्याचे 'बुद्धिअपत्य' (इंटलेक्चयुअल चाईल्ड) जन्माला घातले तर तोच त्याचा कर्ता/धर्ता असतो. मग त्याच्या द्रष्टेपणामुळे त्याचे हे अपत्य 'कर्तरी' प्रयोगाने वाढत रहाते. त्यात अनेक माणसे निष्ठेने, विचारांनी, कर्मांनी सामावली जातात. ''तो एकटाच होता चालताना मागे कधी तांडा झाला; कळलेच नाही, कळलेच नाही.'' असे त्याचे कालप्रवाहात रूप होते. मग ते एकट्याचे कार्य उरत नाही. कार्य करणारे, निष्ठेने परंपरा चालवणारे, त्या द्रष्ट्या माणसाच्या कर्तेपणाला सांघिक रूप देणारे... असे अनेकजण पुढे येतात. 'पालखीचे भोई' होतात. म्हणता म्हणता एका विधायक कार्याची सतत पुढे पुढे जाणारी उत्साहवर्धक, आनंदी, प्रेरणादायक जगण्याची आनंदी उर्जा देणारी 'वारी' होते. वाचकहो, तुम्ही सूज्ञ आहात. कळलेच असेल तुम्हाला की मी काय सांगू पहातेय. कारण तुम्हीही या संदर्भात वारकरी आहात, धारकरी आहात, दूरार्थाने पण सत्यार्थाने कर्तेकरवितेही आहात. आपला (आपला बरं का. माझा किंवा 'प्रभुतरुण बोर्डा'चा नाही!) प्रभुतरुण परवा म्हणजे बावीस ऑगस्ट वीसशे; एकवीस साली अठ्ठ्याणव वर्षांचा झाला. विष्णुपंत कोठारे या द्रष्ट्या माणसाने 'प्रभुतरुण' हे बौद्धिक अपत्य जन्माला घातले. 'बावीस ऑगस्ट' ही इंग्रजी तारीख आणि हिंदू पंचांगाप्रमाणे नारळीपौर्णिमा अठ्ठ्याण्णव वर्षांनी हा दुर्मीळ योग यावर्षी एकत्रित आला. तारीख आणि तिथी एकाच दिवशी अन् भरीत भर म्हणजे रविवार हा आरामदिवस. (असं म्हणतात की दर एकोणीस वर्षांनी असा योग येतो. या बाबतीत म्हणणे काही असो; वस्तुस्थिती इतकीच की प्रभुतरुणाचा अठ्ठ्याणवावा वाढदिवस असा दुर्मिळ योग साधत आलाय!)

*संपादकीय*

## या सुखांनो या

—सुहासिनी कीर्तिकर

प्रभुतरुणाचा हा वाढदिवस साजरा करण्यासाठी जगभरचे परभू उपस्थित होते. 'ऑनलाईन' कार्यक्रम करण्याची प्रभुतरुणाने केलेली आपल्या ज्ञातीतील सुरुवात जगभरातील परभांसाठी मुक्तांगण ठरली. आचार्य अत्रे त्यांच्या शैलीत म्हणायचे की 'असा सोहळा गेल्या दहा हजार वर्षात झाला नाही. त्यांचीच 'री' ओढून मी म्हणते की 'असा जगभर साजरा होणारा प्रभुतरुणाचा वाढदिवस गेल्या अठ्ठ्याणव वर्षात झाला नाही.' अत्रे अतिशयोक्ती करायचे. माझ्या या विधानात मात्र जऽऽराही अतिशयोक्ती नाही. तुम्हाला मान्यच असणार ते.

कारण 'प्रभुतरुण' मित्रांनो, बावीस ऑगस्टला संध्याकाळी सात वाजता सुरू झालेल्या या 'डिजिटल प्लॅटफॉर्म' वरील सोहळ्याचे तुम्ही साक्षी होता, त्यात तुम्ही सहभागी होता. तरी 'पाहिलेचि पहावे पुन्हा पुन्हा' प्रमाणे हा सोहळा या लेखांतून पुन्हा आठवावा, त्याचा जागर व्हावा असे तुम्हाला नक्की वाटत असणारच. म्हणून या माझ्या संपादकीयातून त्याची पुन्हा एकदा उजळणी.

संध्याकाळी बरोब्बर सात वाजता 'वक्रतुण्ड महाकाय' म्हणत गणेशाला वंदन करीत या सोहळ्याला सुरुवात झाली. आजवरच्या प्रथेप्रमाणे पूर्व संपादक कै. सुहास कोठारे आणि कै. विहंग नायक यांच्या प्रतिमांना पुष्पहार घातले गेले. मात्र दरवर्षी ते प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत, त्यांच्या हस्ते घातले जायचे. या वर्षी आपल्या सर्वांच्या उपस्थितीत सुहास कोठारेंचे चिरंजीव आणि प्रभुतरुण बोर्डाचे विश्वस्त श्री. दीपक आणि विहंग नायकांचे चिरंजीव व प्रभुतरुणाचे विश्वस्त गुंजारव यांनी विहंगच्या प्रतिमेला हार घालून वंदन केले. (काय गंमत पहा; सुहास आणि विहंग जीवाभावाचे मित्र. डिजीटल चमत्काराने या नाविन्यपूर्ण वाढदिवसालाही शेजारी शेजारी दिसले. पहातांना ऊर भरून आला!) मग आतापर्यंतच्या काही वाढदिवसांची झलक दिसली घरोघरी पडद्यावर. 'प्रभु प्रभात'च्या संपादिका वृंदा जयकर (आणि श्याम जयकरही!) इतकी वर्षे या वाढदिवशी स्वत:तर्फे (आता शामरावांचे स्मरण म्हणून) केक आणायच्या. देणगी यायच्या. (या वर्षी देणगी आहेच त्यांची.) प्रभुतरूणाचा वाढदिवसाचा मोठ्ठा केक आणि बुजुर्ग स्नेही मंडळी आम्हा सर्व संपादकांसह पडद्यावर दिसताच पूर्वस्मृति जाग्या न आल्या तरच नवल. या आठवणी दाटून येत असतानाच संपादक म्हणून माझे भाषण झाले. (वाचन नव्हे!) त्यात मी म्हटलं की 'वाढदिवस म्हणजे एक आवर्तन पुरे होऊन दुसरे सुरू होण्याचा आनंदसोहळा. अशावेळी या वर्षाचा आढावा घेणे उचित ठरते, अटळही!' मग या वर्षीच्या प्रभुतरुणाची ठळक वैशिष्ट्ये मी अधोरेखित केली. या वर्षी चारऐवजी पाच सदरे देण्याचा विक्रम प्रभुतरुणाने केला. सौ. गीता आंबवणे आणि सौ. अनारकली वेलकर यांच्या सदरांत इतर अनेक लेखकांना सामावून घेतले गेले. सौमित्र वेलकर अत्यंत व्यस्त असूनही न चुकता पाककृती देतात. वीरधवल तळपदे आणि आरती कोठारे हे तरुण पिढीचे प्रतिनिधी. या दोन्ही तरुणांचे खास कौतुक अशासाठी की वीरधवलने माझ्या विनंतीला मान देऊन मराठीत लिहिणे सुरू केले तर; आरतीने बारावीच्या परीक्षेचे सगळे ताळतंत्र सांभाळत कविता, फोडी, लेख देत सदराचे सातत्य राखले. या वर्षी आपले चारही कार्यकारी संपादक अधूनमधून लिहिते झाले हे विशेषच. हेमंत तळपदे, नलिनी तळपदे यांनी कविता दिल्या. यावर्षीचा दिवाळी अंकही वैशिष्ट्यपूर्ण होता, सर्वांची दाद देऊन गेला. या भाषणात मी ऑनलाईन उपक्रमांना दाद दिलीच; पण 'स्टँडअप कॉमेडी' होऊ न शकल्याने एक विनोदही सांगितला. माझ्या भाषणावर नंतर कौतुकाचा वर्षाव झाला; यातच सारे पावले.

नंतर विश्वस्त श्री. बन्सी धुरंधर समयोचित बोलले. नव्या दमाचे विश्वस्त आता प्र. तरुण बोर्ड सांभाळायला आहेत; हे त्यांनी आवर्जून सांगितले. आपली वेबसाईट नव्याने 'लाँच' होतेय; याचा उल्लेख अभिमानाने केला. नवीन तंत्रामुळे नवीन गोष्टी कळल्या, मैत्री सतत वाढती राहो' असे ते व्यक्त झाले. मैत्री ही वर्तुळासारखी असते, ती कधीच कमी होऊ नये, लोभ कायम असावा असे त्यांनी आवाहन केले. 'प्रभुतरुण सतत तरुण ठेवा' असा संदेश दिला. या त्यांच्या आवाहनाला 'मम' म्हणत दीपक, गुंजारव, प्रणव देसाई, मिथील नवलकर या विश्वस्तांनीही आपले मनोगत व्यक्त केले. 'चेंज इज इनएव्हिटेबल, ग्रोथ इज ॲन ऑप्शन' या वचनानुसारच प्रभुतरुण वाढणार हे या सर्वांनी अधोरेखित केले. २०२३ ला आपला शंभरावा वाढदिवस असणार आहे - ही आनंददायी बाब यातून बिंबवली गेली. नंतर या कार्यक्रमात सहभागी असलेल्या जबाबदार, 'तरुण' प्रमुख सौ. संजना कोठारे आणि सौ. मयूरा नायक यांनी जोडीने मनोगत व्यक्त करताना 'तरूणा'चे जुने

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)
ऋणानुबंधी असलेल्या; पण आज हयात नसणाऱ्यांची आठवण केली. त्यात पद्मश्री डॉ. सदाशिव गोरक्षकर, डॉ. गजानन विजयकर, डॉ. प्रफुल्ल विजयकर, श्री. प्रदीप कोठारे, श्री. प्रभाकर, श्री. मुकुंद अजिंक्य, रवीन्द्र मानकर अशा अनेकांचा समावेश होता. दोन वर्षानंतर पूर्ण 'डिजीटल प्लॅटफॉर्म' येणार आहे - असे जाहीर केले. त्यासाठी गेल्या वर्षापासून प्रत्येक डिजीटल कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी झटणाऱ्या सौ. ज्ञानदा आणि सुनील पवार, डॉ. मोनिका राणे अय्यर, आदीविषयी कृतज्ञता व्यक्त केली.. अन्.... अन्...

मग सुरू झाला 'रिदमेनिया' हा मनोरंजनाचा कार्यक्रम. तोपर्यंत सौ. भक्ती प्रधान शेट्येने निवेदक म्हणून जबाबदारी सांभाळली होती. 'रिदमेनिया' सुरू झाला तो मोनिका राणे अय्यर यांच्या सळसळत्या उत्साहाने, हसऱ्या नाचऱ्या निवेदनाने, 'रिदम' सांभाळत केलेल्या आलेपणाच्या भाष्याने. मोनिका पडद्यावर आली तीच 'मी आली परत हसायला, गडबड करायला' म्हणत नारळी पौर्णिमेच्या शुभेच्छा देत. नारळीपौर्णिमेला समुद्र दर्शन घेतात. मोनिकाने 'रिदमेनिया' तील कलावंताच्या कलांचे दर्शन घडविले.

'हम जहाँ खडे होते हैं, लाईन वहाँसे शुरू' होगी याची जणू खात्री बाळगत तिने प्रत्येक कलावंताची कला रसिकप्रेक्षकांना मस्त आस्वादमय वाटेल अशी सादर केली. या सर्व कलावंतांची यादी या छोट्याशा संपादकीयात मला देता येणार नाही. पण तरीही जेवढे जमेल तेव्हढे उधाण आवरत मी या 'आनंदाच्या डोही' असणारे 'आनंद तरंग' आठवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत्ये. (काही नावे राहून गेली तर क्षमस्व मित्रांनो.)

रॉनिकाला मोनिकाने नावच दिले 'गोडवा'! ती आणि विजयने गायलेले 'आओ हुजूर तुमको' श्रोत्यांचा मुजरा घेऊन गेले. मन आणि शरीरावर 'ट्रेक' करणाऱ्या डॉ. पवन कीर्तिकरने 'पुकारता चला हूँ मैं' करीत साद घातली. त्यानंतर लगेच आले नृत्यदर्शन. अवंती असित तळपदे हिने (वय वर्षे अकरा!) 'तेरी मिट्टीमें मिल गया' म्हणत कसरतपूर्ण लवचिक नाचाचा छोटासा मासला दाखविला. त्यात नंतर 'या सुखांनो या' असे स्वरमधुर आवाहन करत सौ. सुहास विजयकर यांनी भर घातली. बिंदिया राणे 'उठे सबके कदम, देखो रम पम पम' म्हणत प्रभुमनांना जुन्या आठवणी जाग्या करत 'शोला बन जाया करो' असेच सांगीतले. सौ. श्रेया तळपदे ही सध्या रंगमंच, मालिकांच्या पडद्यावर नाममुद्रा उमटविणारी कलासक्त मनाची. तिने एक छोटेसे दृश्य-नाट्य-नृत्य असलेले नाटुकलेच (स्किट) सादर केले. शैलेंद्र, सलील नायक, अक्षय नायक यांच्यासह तिने सादर केलेल्या या नाटुकल्यात 'तमा तम्मा लोगे' वर नाच, 'दिल धडकाये' वर नाच, 'लडकी आँख मारे' वर नाच, 'गलतीसे मिस्टेककिया' वर नाच आणि 'आम्ही लग्नाळू' ची धून... अशी घरोघरी पाय थिरकायला लावणारी मज्जा मज्जा होती. 'सनम तेरी कसम' गीत सादर केले मयूरेश वाझरकने. फारच कर्णमधुर असे. असेच एक कर्णमधुर मराठी गीत 'शारद सुंदर चंदेरी राती' सादर केले राखी पांचाळ हिने. समृद्धी आणि संजय परबने नंतर सादर केलेल्या 'कोमल काया, यौवन बिजली' नाचात पुन्हा डोळे खिळले. गीत, नृत्य, गीत अशी लय कार्यक्रमात समतोल साधत गेली. म्हणून मग या नृत्यानंतर उल्हास आणि अंजू अजिंक्य यांचे अद्वैत दाखविणारे छानसे गाणे - 'ये राते ये मौसम, नदीका किनारा' ऐकू आले. पाठोपाठ डॉ. जान्हवी राणे आणि मोनिका राणे या बहिणींचा 'जान कर जाती है'। हा छोटासा झलक सदृश नाच झाला. फारच छान. नंतर मयूराचे वडील दीपक विजयकर यांनी 'बार बार देखो' म्हणून कान तृप्त केले. 'झूमे जाये दिल गाये' म्हणत रूता प्रधाननेही ही तृप्ती वाढवली.

त्यानंतर अतिशय उचित असा विश्वास नाटेकरांचा अभिप्राय आला नृत्यावर. हे नाटेकर कोण? विहंग गेल्यावर प्रभुतरुणाने लागोपाठ तीन वर्षे 'प्रत्युष' सादर केले होते. त्यावेळचे ते नृत्य दिग्दर्शक. त्यांनी जुन्या आठवणी जागवल्या. मयुरा नायक, जान्हवी कीर्तिकर, अनुश्री कोठारे आणि संजना कोठारे या चौघींनी मयुराच्या मार्गदर्शनाखाली या वाढदिवशी जो 'रंगात रंग जो श्याम' नाच सादर केला, त्यातील रंग उत्तम असल्याची ग्वाही त्यांनी दिली. 'कोरियाग्राफी'चे कौतुक केले. मोनिकाने लगेच प्रतिक्रिया दिली की 'सम बॉण्डस् आर फॉर एव्हर.' खरेच आहे ना ते.

मग आणखी छान कार्यक्रम झाला तो 'इन्स्ट्रूमेंटल सादरीकरणाचा. मोहनीश (मोनिष?) शेट्ये, शिवानी आणि सागर देवरूखकर, राजा यांनी 'चुरा लिया जो तुमने' हे वाद्यांवर वाजवून खरोखर दिल चुरा लिया! या आनंदात भर घातली. 'तू ही है।' म्हणत रोहन प्रधानने मोनिकाच्या मते 'छोटुशी बाहुली' असणाऱ्या आराह अजिंक्यने 'चुनके सपना बनाया' गाणे बहारदार सादर केले. कान आणि डोळे यांना मेजवानीच होती आराह! तिला सादरीकरणाचे भान होते हे विशेष.

मग तो बहुप्रतिक्षित क्षण आला. 'क्षण आला भाग्याचा' असाच. नव्याने प्रभुतरुणाची वेबसाईट चमचमत्या चांदण्यांच्या प्रकाशात, विश्वस्तांच्या उपस्थितीत, आनंदाच्या रोषणाईत ही 'वेबसाईट' 'लाँच' होताना सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रभुतरुणाचा इतिहास, इतर सगळी माहिती, युवामंच, रजिस्ट्रेशन लिंक, 'मार्केट प्लेस', 'मॅट्रिमोनियल', 'आरकाईव्ह सेक्शन', 'गॅलरी' इ. इ. त्यात असेल. प्रभुतरुणाचे फेसबुक असेलच तिथे ज्यात सणांची माहिती, 'सोकाजी इन्फ्लुअन्स' इ. असेल. व्यवसायाची माहिती, टॅलेन्ट सेक्शन 'कॉन्टॅक्ट प्लेस', 'मेंटॉर' वगैरे वगैरे बरेच काही त्यात असेल. info@prabhutarun.com ही ती 'साईट आहे.

कार्य, कार्यकर्त्यांचा उत्साह, थोरांचे मार्गदर्शन आणि रसिकहो,
(पान ६ कॉलम ३ वर)

# तू आज भी है मेरे लिये

**—सुहासिनी कीर्तिकर**

ती सतत उत्साहाने सळसळणारी. लोभस चेहरा, लांब केस, नीटनेटका पेहराव, वागण्या बोलण्यात लाघवी. बुद्धीने अत्यंत हुशार. सगळ्याच कलांमध्ये तिला रस. सहजच सगळ्यांना ओढ लावणारी. सगळ्या नात्यांतील सगळी कर्तव्ये अत्यंत सहजतेने, सफाईने, माणसांना प्रेम देत घेत पार पाडणारी. एकाच व्यक्तीत असे आदर्श रूप क्वचितच सापडते. ती... ती... म्हणजे कोण?

ती माझी लाडकी भाची. आताची डॉ. सुनंदा नीतिश कीर्तिकर-माहेरची सुनंदा योगेश आगासकर. आमची लाडकी सुनन्! शाळकरी वयात सर्व स्पर्धांमध्ये भाग घेणारी, हुशार विद्यार्थिनी. पार्ले टिळक विद्यालयाला वक्तृत्वाची बक्षिसे मिळवून देणारी. अशी वक्तृत्वस्पर्धा असली की ती पूर्वतयारी करून मुद्दे काढून मग माझी मदत घ्यायची. मी थोडे मुद्दे भर घालणे, एखादे फार छान वाक्य देणे किंवा बोलण्यातली लय कशी पकडायची त्याचे भान देत असे. पण माझा मदतीचा हात पकडताना तिची ती स्वतंत्रपणे चालायची. त्यामुळे सगळी सगळी वक्तृत्वाची, लेखनाची बक्षिसे अगदी तिची स्वत:ची होती. शाळेला जातानाही लांब केसांच्या दुमडलेल्या चक्करावर भरपूर फुले, गजरे, वेण्या माळायची. फुलांची वाडी तयार करणे, तऱ्हेतऱ्हेची शुभेच्छा पत्रे तयार करणे, चित्रे काढणे, रांगोळी काढणे, सपाटून वाचन करणे हे तिचे इतर कामांमधले विरंगुळा असणारे छंद होते. कधीतरी एकदा महिला समाज की सोशल समाजाची रांगोळी स्पर्धा 'सुरेश विठ्ठल' मध्ये झाली होती. मला आठवते की तेव्हा माझ्या धाकट्या मुलीने वैजयंतीने आणि सुनन्ने मिळून अत्यंत देखणी पाण्यावरची रांगोळी काढली होती. त्या रांगोळीतील झाडाच्या खोडावरचा तो सुतारपक्षी अजून माझ्या आठवणींवर 'टोक टोक' करतो आहे. जमेल तेव्हा माझ्या भाषणांना ती यायची, स्वत:चे मत सांगायची. तिला अगदी ठरवून डॉक्टरच व्हायचे होते. आजोबांची, तिच्या काकाची परंपरा चालवायची होती. त्यासाठी ती हॉस्टेलवर झेपावली. 'एमबीबीएस्' झाली. हॉस्टेलमधून तिची मला पत्रं येत. किती सुंदर विचार, मार्मिक अवलोकन अन् आत्याशी मैत्रिणीसारखे हितगूज असायचे त्या पत्रांत. ती पत्रे मी अजून जपून ठेवली आहेत. मग परतून आल्यावर माझ्या पावलांवर पाऊल ठेवत ती 'जी एस मेडिकल कॉलेज'मध्ये लेक्चरर झाली. (हे केईम हॉस्पिटलचे कॉलेज आहे. तिचा काका डॉ. सुनीलही याच कॉलेजचा मेडिकलचा विद्यार्थी.) स्वतंत्र व्यवसाय करून घर सांभाळणे तसे कठीणच होते तिला. मेडिकल कॉलेजमध्ये शिकवता शिकवता 'एम.डी.' ही (पदव्युत्तर उच्च परीक्षा) दिली. डॉ. सुनंदा मेडिकलच्या विद्यार्थ्यांत खूप लोकप्रिय होती. पुढे ती 'कूपर'ला गेली.

हे सगळे करता करता सासू सासरे, मुले यांचे तिने हसतमुखाने अगदी सगळे सगळे केले. सळसळता उत्साह, कर्तव्याची जाण, आपल्या माणसांसाठी अगदी आतून येणारे आपलेपण यामुळे सुनन्, आदर्श आणि आनंदी जीवन समृद्धपणे जगत होती. इतरांना सुख, आनंद याची पॉझिटिव्ह 'लस' असली तरी, म्हणजे खूप छान छान, आदर्श असे माहेरी सासरी जगणे असले तरी ही लस अखेरी नियतीने अपुरी ठरवली. तो 'सल' माझ्या मनात आता कायमचाच राहील. तिचे सळसळते जगणे असाध्य दुखण्याने (कॅन्सरने) झाकोळून गेले. त्यालाही ती नेटाने सामोरी गेली. खरेच धीराची माझी सुनन्!

अन् सामोरी जाता जाता अचानक पाठमोरी झाली. चौदा तारखेला गेलीच ती. हतबल हतबल झालो आम्ही. सुनन्, तुझ्या आईबाबांना, आत्या काकांना, तुझ्या भावंडांना, तुझ्या सासरच्या मंडळींना आणि अर्थात तुझ्या कोवळ्या मुलांना आता तुझ्या आठवणींचाच आधार. पण एक लक्षात ठेव सुनन्, आठवणींतून तू सतत, कायम जगणार आहेस. मला माहीत आहे की हे तू आधीच जाणले आहेस. 'सुख दु:ख समे कृत्वा!' त्याच साच्यात जगणारी तू माणसाच्या जगण्याचे, जीवन-मरणाचे तत्त्वज्ञान समजून घेतले होतेस - समृद्ध होतीस तू. त्याच श्रद्धेचा हवाला देऊन मी 'तुझी माईआत्या' खात्री देतेय की 'सुनन्' तू आज भी है मेरे लिए जन्नत - ए - खयाल। हे तुझमें दफन मेरी' जिंदगीके इतने साल।।''

(टीप : लेखातील शेवटच्या ओळी साहिर लुधियानवींच्या आहेत. फक्त शेवटचे तीन शब्द माझे. याक्षणी मी नि:शब्द!)

From the heart

# MODERN CHILDHOOD– MORE PRIVILEGES OR MORE PRESSURES

**-Anarkali Sandip Velkar**

This month we come to another very interesting topic to ponder upon Modern Childhood - More Privileges or more pressures

Modern childhood is undoubtedly complex and multi-faceted. Today, children are blessed with lot many opportunities for career development, have access to technology and comforts. Yet some regret what they see as the disappearance or erosion of childhood, bringing a lot of questions to our mind.

So is modern childhood a case of knowledge gained but innocence lost?

Do the materialistic comforts of today's childhood compensate for the increase in stress and competition?

Was the childhood in the olden days perfect or are we too nostalgic about the olden childhood?

To get a clearer view, we have opinions from various age groups

**Age 15+**

**Arav Trilokekar, Student Std. IX**

As the years progress, the lifestyle of people changes. But how has childhood changed in these modern times? Well, it's easier and harder at the same time. Modern technology has reached points that would seem impossible 100 years ago. We have phones, laptops, T.V.s and a lot of other privileges. This makes means of communication as well as entertainment very easy to find. But at the same time modern childhood can be very hard. Education has progressed and the syllabus has increased along with it. There is a lot of pressure applied on us to study and to get good marks. Exams apply so much pressure on us that there is very less time to just relax and spend time with family and friends. This increase in pressure as well as privileges makes life harder and easier for us children.

**Age 45+**

**Ajita Rajan Jayakar, BA, LLB**

Modern childhood is a mixed bag. The approach and perspective of the modern child's parents and family will decide the nature of its childhood.

Today's typical urban children are blessed with several assets, viz., technology, availability of resources, parental support, be it physical involvement or financial support to name just a few.

Having said that, childhood can be joyful and privileged or stressful depending upon how the children are brought up by the parents.

People of my generation were probably more fortunate in their childhood, as in, parents were watchful, gave due importance to education, but allowed us enough of time to play outdoor as well as indoor games. Speaking for myself, I was given complete freedom to pursue my career path which I chose, nothing was imposed on me.

Whereas in today's times, there is tremendous pressure on the child to perform every day in the rat race. If the parents can bring about the right balance in the child's growth, the child will not feel stressed. It is disconcerting to note that some children start preparing for entrance in IIT/AIIMS right from school days!

In all probability, modern childhood is by and large stressful for the middle class whose aim in life is to get the best education so as to ensure good prospects in the job market, in India or overseas.

**Age 45+**

**Ronica Vijayakar, Home Science Graduate & Singer**

There is a saying in marathi 'lahaanpan dega deva' which means God give me childhood. Childhood is a carefree time. You don't have to worry about earning a living and providing for your family. You don't have to worry about putting a meal on the table. This is a time of just enjoyment and fun.

But in these competitive days is it really just fun and frolic for the children? Today's child is rushing from one class to the other so that he/she is not left behind in the rat race. A couple of years ago there was a spate of suicides amongst school going children because they did not score the required marks. What made them take this drastic step. Is scoring a particular total so important that failure to do so meant the end of the road? Parental pressure, peer pressure, societal pressure leads to mental breakdown of the child.

It's high time we realize that each child is different. Every child is special and has some ability which he/she can develop. It need not necessarily lead to high profile jobs or careers but in the end it's the mental satisfaction that matters. In today's world people are so busy climbing the corporate ladder that they do not have time to pursue their hobbies, spend time with their loved ones, go on vacation. It is high time we change this attitude and this can be done only if we as parents teach our children that it's ok to fail or that it's ok not to excel at everything. We have to teach them to accept failure with grace and not humiliate them. Only when we do this will we have a generation which is not only healthy physically but also mentally.

**Age Group 15+**

**Aarati Jayesh Kothare, Arts, Student Std XII**

In my opinion, it all depends on the way we perceive ourselves and our situation. Off course we cannot neglect the fact that changing times, technological advancements, changing mindsets and population growth have surely put a lot of pressure on each individual right from an early age – it's like we are being put into a rat-race right from the moment we are born…after all it's as Darwin says "Survival of the fittest"- yet we cannot ignore that many of them have made our lives comfortable and given us a lot of privileges too!

If travelling in heavy traffic is a pressure, then commutation facilities and infrastructural networks are a privilege. If academic competition is a pressure, then educational policies and healthy student-teacher relationships are a privilege! Majority of the children being the only child in nuclear families tend to have exclusive attention from their parents...it's a privilege…yet having less companions and getting over protected is again adding to pressure – either directly or indirectly.

It's just the matter of the child's attitude – which is largely dependent on his/her upbringing and peer group. Pressures are there and so are privileges…it's on what one wants to focus his/her attention onto!

⁕

# शिक्षकाचा ज्ञानमार्गी अनुभव...

**- गीता आंबवणे**

## मी शिक्षिका

मी. सौ. आशा विजयकर, पूर्वाश्रमीची कु. आशा जयकर, खारची रहिवासी व त्यावेळच्या प्रतिष्ठित बी. पी. एेम्. हायस्कूलची विद्यार्थिनी. त्यावेळी तरी मोठेपणी कोण व्हावंस वाटतं असं विचारल्यावर ६०/७० टक्के मुलींचं उत्तर शिक्षिका असंच असायचं. त्यावेळी आजच्या इतक्या संधी व क्षेत्र उपलब्ध नसल्यामुळे कदाचित असू शकेल. माझी तशी इच्छा होती की नाही ते आतातरी मला आठवत नाही पण मी या क्षेत्रात केवळ अपघाताने किंवा योगायोगानेच आले असं म्हणावं लागेल.

शैक्षणिक क्षेत्राची कोणतीही पार्श्वभूमी नसतानाही मी इथे अगदी थोड्या काळातच आनंदाने रुळले याचे कारण म्हणजे शाळेचा एकंदर माहौल व मला मिळालेल्या सह-शिक्षिकेची साथ.

मला लहानपणापासूनच शिकत असताना नाटकात काम करण्याची, स्टेजवर वावरण्याची अतिशय आवड असल्याने त्याचा मी येथे पुरेपूर उपयोग करून घेतला. त्यावेळी आमच्या शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाव्यतिरिक्त प्रत्येक वर्गागणिक कार्यक्रम सादर केले जात. तीन वर्षे मला वार्षिक स्नेहसंमेलनाचीही पूर्ण जबाबदारी सांभाळण्याचीही संधी मिळाली. या अनुभवांनी मला आनंद तर दिलाच पण हेही कळलं की आपल्यालाही मुलांकडून शिकण्यासारखं बरंच काही असतं.

चौथीच्या शिष्यवृत्तीचे वर्ग घेण्याची संधीही मला बरेच वर्षे देण्यात आली होती. हाही अेक मलाच समृद्ध करणारा अनुभव म्हणता येईल कारण थोड्या ट्रिकी असणाऱ्या प्रश्नांमुळे आपला मेंदूही तरतरीत रहाण्यास मदत होते.

शाळा दरवर्षी चौथीच्या मुलांना चार दिवस महाबळेश्वरच्या सहलीला नेत असे. याचे संयोजन करून ती पार पाडण्यात मुख्याध्यापिकेबरोबरच सहभागी होण्याची जबाबदारीही मी यशस्वीपणे पार पाडली.

आमच्या मुख्याध्यापिका तीन महिने परदेशी गेलेल्या असतांना त्यांच्या जागी ऑफिसिएटिंग मुख्याध्यापिका म्हणून काम पाहण्याची जबाबदारी मला विश्वस्तांनी दिली. याच काळात इतर कामांबरोबरच पी.टी.ए.ची स्थापना करण्यातही माझा सहभाग होता.

अशा तऱ्हेने माझा शिक्षिका म्हणून फक्त अठराच वर्ष काळ असला तरी तो मी अगदी भरभरून जगले असं मला वाटतं. जॉब सॅटिसफॅक्शन या उक्तीचा अर्थ मला लहान मुलांच्या संगतीत नक्कीच कळला; याचं समाधान मला आयुष्यभर पुरेल. प्राथमिक शाळेत शिकवत असल्यामुळे वृद्धत्त्वी जरी नाही तरी वाढत्या वयात शैशव जपण्याचा बाणा मी नक्कीच जपू शकले.

**मनातले काही...**

## आमचे बाप्पा

**-कु. आरती जयेश कोठारे**

भारतीय संस्कृतीतील सर्वाधिक लोकप्रिय आराध्य दैवत म्हणजे आपले लाडके बाप्पा! गणेशोत्सव भारतभरात आणि आज - काल विदेशातही अगदी थाटामाटात साजरा होतो. उत्साह, प्रसन्नता आणि जल्लोषमय वातावरणातला गणेशोत्सव दरवर्षी दिमाखात पार पडतो. बदलत्या trends प्रमाणे नवनवीन गणेश मूर्ती रूपाला येतात. मुकुट, दागिने आणि मखरांचे डिझाईन्स बदलत असतात. बदलत नाही ते फक्त एकच - आपल्या लाडक्या बाप्पांच्या आगमनाचा आनंद आणि त्यांच्याबद्दल वाटणारे प्रेम आणि आपुलकी. घरोघरी गणरायांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू असते. नुसती लगबग - लगबग. सर्वात पहिली येते ती घराची साफसफाई! मग पूजेची भांडी काढणे. ब्रासो, सिल्व्हो आणि पितांबरी यांसारख्या पावडरी वापरून ती चकचकीत करणे. घरातील पारंपरिक खेळ (म्हणजे आजूबाजूला ठेवायच्या सजावटीच्या वस्तू - जसे लग्नात रुखवत ठेवतात तसे) काढून साफ करणे. इतर सजावटीचे सामान बाजारातून आणणे. मूर्तीशाळेतील मूर्ती सिलेक्ट करून आगाऊ मागणी नोंदवणे. वेगवेगळ्या याद्या बनवणे - कुठल्या दिवशी कुठला प्रसाद दाखवायचा? घरी बनवणार असू तर त्यासाठी लागणारे साहित्य, बाहेरून आणायचे असल्यास कोणाकडून? किती किलो? वगैरे वगैरे.

आमच्याकडे मात्र मूर्ती सिलेक्ट आणि बुक करण्याचा प्रश्नच येत नाही. आमची तयारी एक-दीड महिना आधीपासूनच गणपतीची मूर्ती बनवण्यापासून सुरू होते बरं का! आम्ही घरीच शाडूच्या मातीचा गणपती तयार करतो. आमच्या तयारीचा सर्वात मोठा भाग म्हणजे ही मूर्ती बनवणे. साधी चिकण माती (modelling clay) ही रेडी टू युज असते, त्यामुळे चिकण मातीचा गणपती पटकन तयार होतो. त्याउलट शाडूची माती ही पावडर सारखी असते, त्यामुळे ती भिजवून, मळून त्याची मूर्ती तयार करून ती ओली मूर्ती सुकेस्तोवरच खूप वेळ जातो. मग रंगकाम करायचं. मग हे रंग सुकायला हवेत. म्हणून प्रसादापेक्षाही मूर्ती बनवणे हा आमच्याकडच्या तयारीचा प्रमुख भाग होय.

गेल्यावर्षी पहिला लॉकडाऊन जाहीर होण्याअगोदरच आम्ही गावाला गेलो होतो आणि नंतर तिथेच राहिलो. माझं study from home असल्याने मला वेळच वेळ होता! असेच अचानक वाटले की या वर्षीचा गणपती आपणच बनवला तर! दरवर्षी आई किंवा बाबा गणपती बनवायचे आणि मी फक्त बाजूची बारीक-सारीक कामं करून द्यायचे. पण ट्राय करायला साहित्य होतं कुठे? ते तर मुंबईच्या घरीच राहिले होते. मग आम्ही जवळच्या मूर्तीशाळेत जाऊन थोडी माती आणली. मग ती थोडी भिजवून मळली. बाबा म्हणतो त्याप्रमाणे तिच्यावर संस्कार केले! आता मातीला आकार द्यायची वेळ आली होती, पण रेखण्या कुठे होत्या? रेखण्या म्हणजे shaping/carving ची tools/instruments. मग आई आणि आजीला थोडा मस्का मारून स्वयंपाकघरातल्या butter knife ला मी माझी रेखणी बनवण्यात यशस्वी झाले! मग रंगकामसुद्धा हळद-कुंकू, तांदूळपीठ, मुलतानी माती वगैरेनीच केले. म्हणजे फुल टू नॅचरल!

तोपर्यंत आई आणि आजीचे प्रसादासाठीचे बेसनाचे लाडू तयार झाले होते. बेसन लाडू तर माझे ऑल टाईम फेवरेट, पण गणपतीतला माझा सर्वात आवडता प्रसाद म्हणजे ‘खिरापत’. आम्ही खिरापत विसर्जनाच्या दिवशी करतो. प्रत्येक घरातील खिरापत वेगवेगळ्या प्रकारची असते. आमच्याकडची खिरापत सुके खोबरे, सुकामेवा, शेंगदाणे व हिरवी मिरची तळून, एकत्र करून चवीपुरते मीठ, साखर आणि थोडसं लाल तिखट टाकून बनवली जाते. एकदम चमचमीत! परत-परत खावीशी वाटणारी! अतिशय खमंग! असो...

मागच्या वर्षी मी मूर्त गणपती बनवला होता. यावर्षी मात्र अमूर्त बनवण्याचा प्रयत्न केला. मूर्त म्हणजे ज्याचे डोळे, हात - पाय, गंध, पितांबर, उपरणं, मुकुट, दागिने वगैरे स्पष्टपणे दाखवले जातात. यांना जास्त रंगकाम व नक्षीकाम असते. In short, it is beautifully detailed and richly decorated. अमूर्त म्हणजे ज्याची फक्त आकृती बनवली जाते. यांना जास्त डिटेल्स नसतात. अगदी सोपं उदाहरण द्यायचं झालं तर ‘लालबागचा राजा’ हा मूर्त तर ‘अष्टविनायक गणपती’ हे अमूर्त असे आपण मानू शकतो.

मूर्त असोत की अमूर्त, आपले बाप्पा नेहमीच आपले लाडके असतात. तर अशा या लाडक्या विघ्नहर्त्याकडे आपण सर्वजण मिळून ‘जगावर कोसळलेले हे कोरोनाचे संकट लवकर निघून जावो’ अशी मनोभावे प्रार्थना करूया जेणेकरून येणारे सर्व गणेशोत्सव पूर्वीप्रमाणे सगळ्यांना एकत्र येऊन जल्लोषात साजरे करता येतील.

बोला तर मग -<br>
गणपती बाप्पा मोर्या!<br>
मंगलमूर्ती मोर्या!

---

# सोन्याचा गणपती

**- दीपक माधवराव धैर्यवान**

आमच्या धैर्यवान कुटुंबाचा गणपती हा सोन्याचा गणपती म्हणून प्रसिद्ध आहे. हा गणपती नुसताच सोन्याचा आहे असं नव्हे तर. ह्या गणेशमूर्तिची अनेक वैशिष्ठ्ये आहेत. सर्वप्रथम महत्त्वाचे म्हणजे ही गणेशमूर्ती कोणत्याही मूर्तिशाळेत तयार केली जात नसून तिची घडण ही गेली अनेक वर्षे आमच्या धैर्यवान कुटुंबातील सदस्यांकडूनच बनविली जाते. फार पूर्वीपासून हे काम आमचे पूर्वज करत आले आहेत पण माझ्या बालपणापासून ही मूर्ति बनविण्याचे काम माझे आजोबा श्री. रामराव गणपतराव धैर्यवान हे अनेक वर्षे करत होते. त्यानंतर वार्धक्यामुळे हे काम त्यांचे चिरंजीव व आमचे काका श्री विष्णू रामराव धैर्यवान ह समर्थपणे करीत होते व नंतर त्यांच्या निधनानंतर हे काम आमचे चुलत बंधु श्री. चंद्रशेखर विष्णू रामराव धैर्यवान अखंडपणे आजपर्यंत अत्यंत श्रद्धेने व कुशलतेने करीत आले आहेत.

एक मोठी गणेशमूर्ती जी आमच्या धैर्यवान कुटुंबाची म्हणून वर्षानुवर्षे पूजली जाते व दुसरी त्यामानाने लहान गणेशमूर्ती जी आमच्या आजोबांचे मोठे बंधु कै. डॉ. माणिकराव गणपतराव धैर्यवान ह्यांचे घरी पूजली जाते. मोठ्या मूर्तिची उंची ११ इंच व वजन ५ किलो असते तर लहान मूर्तिची उंची ९ इंच व वजन २.५ किलो असते दोन्ही मूर्ती बनविताना शाडूची माती मोजून घेतली जाते.

सध्या आमच्या धैर्यवान कुटुंबाची मोठी गणेशमूर्ती श्री. चंद्रशेखर विष्णू धैर्यवान ह्यांचे निवासस्थानी घाटकोपर येथे १० दिवस पूजली जाते. तत्पूर्वी गेली अनेक वर्षे ही मूर्ती आमचे चुलते डॉ. खंडेराव आनंदराव धैर्यवान ह्यांचे खार येथील निवासस्थानी व नंतर त्यांचे चिरंजीव श्री. रंजन खंडेराव धैर्यवान ह्यांचे लोखंडवाला व नंतर पुणे येथील घरी पूजली जात असे. दूसरी लहान मूर्ती गेली अनेक वर्षे आर्किटेक्ट श्री. प्रदीप चंद्रकांत माणिकराव धैर्यवान ह्यांचे खार येथील निवासस्थानी पूजली जाते.

आता ह्या गणेशमूर्ती प्रत्यक्ष कशा घडविल्या जातात ते पाहूया. प्रथम सर्वात महत्त्वाचे म्हणजे ह्या मूर्ती भरीव (पोकळ नव्हे) असतात. त्यांचा साचा नाही. लोखंडी चौरंगावर मोठ्या मूर्तिचा बेस ७ इंच व लहान मूर्तिचा बेस ५ इंच ठेऊन केवळ नजर अंदाजाने त्या यशस्वीपणे घडविल्या जातात. दोन्ही मूर्ती शाडूच्या मातीपासून बनविल्या जातात.

गणेशमूर्ती तयार झाल्यानंतर त्या काही दिवस सुकण्याकरिता ठेवल्या जातात. संपूर्ण सुकल्यानंतर प्रथम ८० नंबर व नंतर १२० इंचाच्या पॉलिश पेपरने अलगदपणे घासल्या जातात ज्यायोगे मातीतील काही लहान सहान खडे निघून जाऊन मूर्ती अगदी गुळगुळीत केली जाते. तसे नाही केले तर नंतर जेव्हा मूर्तिला सोने लावले जाईल तेव्हा ते फाटू शकते. अशा नितळ मूर्तिला नंतर शिरसचा पातळ थर लावून काही दिवस सुकण्यासाठी ठेवली जाते. नंतर मूर्तिवर सफेत खडूचे पातळ द्रावणाचे एक उभा व तो सुकल्यानंतर एक आडवा असे एकावर एक असे २१ थर लावावे जातात व पुन्हा काही दिवस ते सुकण्याकरिता ठेवली जाते. अशी पांढरीशुभ्र मूर्ती जणू काही संगमरवरी मूर्ती भासते. सफेदा पूर्ण सुकल्यानंतर त्यावर गेरूचे (रेड ऑक्साईड) एक उभा व एक आडवा असे १६ थर लावले जातात. ह्या गेरूच्या थरांमुळे नंतर मूर्तिला जे सोनं लावलं जाते ते व्यवस्थित पकडलं जाते. आमच्या गणेशमूर्तिचा पितांबर, शेला बैठक येथे सोने लावले जात नाही. त्यामुळे तेथे गेरू लावला जात नाही. तसेच मूर्ति ज्या मातीच्याच चौरंगावर विराजमान असते त्या चौरंगालाही सोनं न लावता चांदीच्या वर्खाने मढविले जाते.

श्री. गणेशमूर्तिला सोन्याच्या वर्खाची पाने लावण्याची क्रिया खरच वैशिष्ट्यपूर्ण आहे. सोन्याच्या वर्खाचे छोटे छोटे तुकडे केवळ पाण्याच्या सहाय्याने चिकटविले जातात. संपूर्ण सोन्याचा प्राथमिक थर देऊन झाल्यानंतर त्यावर परत सोन्याच्या वर्खाचे छोटे छोटे तुकडे चिकटवत ओपल खड्याच्या ओपसळीने ते अलगदपणे घासले जातात. तरच मग सोन्याला झळाळी प्राप्त होत जाते. ह्या प्रक्रियेलाच गिलीट करणे असे म्हणतात. संपूर्ण गिलीट झालेली ही गणेशमूर्ति इतकी तेजस्वी व लखलखीत दिसते की जणू काही संपूर्ण सोन्याचीच बनविली आहे असे वाटते.

सोनं पूर्ण लावून झाल्यावर व गिलीट पूर्ण झाल्यानंतर मूर्तिच्या पितांबराला पर्शियन ब्ल्यू रंगाने रंगविले जाते व शेल्याला लाल रंग दिला जातो. शेल्याच्या किनारीला सोनं लावून त्यावर रंगाने सुरेख नक्षीकाम केले जाते. गणेशमूर्तिच्या रेखणीचे म्हणजेच डोळे, नाक रेखाटण्याचे अत्यंत नाजूक व कौशल्यपूर्ण काम चंद्रशेखरांचे जेष्ठ सुपुत्र डॉ. अमित चंद्रशेखर धैर्यवान हे अत्यंत सुबकपणे करतात. बैठकही रंगविली जाते. श्री. प्रदीप धैर्यवान ह्यांचे घरी पूजली जाणाऱ्या रेखणीचे काम सौ. अपर्णा अभिजित देवळेकर म्हणजेच सौ. शोभा व श्री. नंदकुमार चंद्रकांत धैर्यवान ह्यांची मुलगी कलात्मकतेने रेखाटते.

अशा सर्व सोपस्कारानंतर तयार झालेली आमच्या धैर्यवान कुटुंबाची दैदिप्यमान श्री. गणेशमूर्ती प्रत्यक्ष पाहूनच तिची विलोभनीयता अनुभवणे शक्य आहे.

गेली अनेक वर्षे अखंडपणे ही मूर्ती घडविण्याचे अत्यंत मेहनतीचे व कुशलतेचे काम यशस्वीपणे व एक हाती पार पाडणाऱ्या आमच्या भावाचे श्री. चंद्रशेखर विष्णू धैर्यवान ह्यांचे मन:पूर्वक अभिनंदन! अनेकांनी ही मूर्ति घडविण्याचा प्रयत्न करून पाहिला पण जमले नाही. केवळ त्यांच्याकडे हा वारसा आला आहे. त्याच्यामुळेच आमच्या धैर्यवान घराण्याची ही परंपरा अखंडपणे सुरू राहिली आहे व ती

(पान ६ कॉलम २ वर)

## My Foodie Corner

-Soumitra Velkar

The verb, "pestare" is the Italian word to describe the action of pounding or crushing. Pesto was originally prepared with a marble mortar and wooden pestle. The ingredients were pounded or crushed with a circular motion of the pestle in the mortar.

Legend has it, that the ancient Romans ate a paste called moretum, prepared by crushing cheese, garlic and herbs together.

The word "pesto" is broad name for anything that is made by crushing ingredients in a mortar-pestle, thereby leaving the "original" sauce recipe open to various adaptations. The recipe that I am sharing with you this month is my interpretation of this classic.

The original pesto recipe calls for pine nuts and Parmigiano Reggiano cheese, whereas I've used ingredients available in most Indian kitchens without pinching your pockets too much at a frightfully expensive delicatessen!

(Purists feel free to skip reading the rest of this column…)

Ingredients

1 Cup Basil Leaves

1 Cup Coriander Leaves

20-25 almonds (soaked in warm water and skins removed) or an equal amount of cashewnuts

1 small Onion, chopped

3/4 Cup grated Amul Cheese

10-12 cloves of garlic

Salt to taste

1/2 Cup Olive Oil (any neutral tasting oil works fine but honestly, there is no substitute for a good olive oil. Brands like Figaro / Borges are commonly available in very small sizes)

Method

Warm 2 tsp of oil gently in a pan and add the onions and garlic with a pinch of salt. Cook gently without browning and let it cool completely.

Boil plenty of water in a vessel and add the basil and coriander. Immediately remove from the water and dunk the blanched leaves into ice cold water to shock them and retain the bright green colour. Drain off any excess water.

Place the leaves, cooled onions and garlic, and all the other ingredients along with an ice cube in a wet blender and blend till smooth without adding any water.

You can store this sauce in the freezer for up to a month. Make sure you do not add any lemon juice or vinegar if storing this for a long time as the sauce will turn black. Even without the acid, the top layer of the sauce will oxidise and turn dark – it is still perfectly good to use.

The sauce is versatile and can aid you to cook up a meal in a jiffy with minimum efforts.

Mix in a tbsp. of pesto with grated paneer and use as a sandwich filling, add it to boiled pasta and top with some cheese for a comforting dinner. Marinate chunks of chicken breast or paneer and veggies of your choice, skewer alternately and grill these in a nonstick pan for a delicious starter… The options are endless. I hope you enjoy this recipe. Glad to hear your feedback!

कविता

## 'श्रावण सरी'

आज पहाटे पाऊस आला माझ्या दारी
श्रावण मासाची चाहूल देऊन गेला कानी.

काळ्या काळ्या मेघांनी दाटून आले नभ
कडकड विजांनी दणाणले तारांगण
सळसळ वाऱ्यांची पसरे झुळूक,
टपटप पडती धारा धरणीवर.
आज पहाटे पाऊस आला माझ्या दारी ।।१।।

झाडांची निस्तेज पाने पुन्हा तरतरली
ओल्या मातीचा सुगंध दरवळला धरणीवरी,
सृष्टीचे हे नवे रूप मजला दिसले,
माझीया मनात सुगंधी मोगरा बहरे
आज पहाटे पाऊस आला माझ्या दारी ।।२।।

क्षणात पडला पाऊस,क्षणात ऊन पडे,
सप्तरंगी इंद्रधनुष्य कमान आभाळी दिसे,
कोमल, नाजूक गवतावर छान ऊन पडे.
एक रंगीबिरंगी फुलपाखरू गवतावर बसे,
आज पहाटे पाऊस आला माझ्या दारी ।।३।।

-सौ भैरवी अश्विन देसाई
(ठाणे)

कविता

## निळ्या नभाच्या भाळी

निळ्या नभी फडकवू तिरंगा
सोसुन अवघ्या झळा,
भारतभूची पवित्र माती,
भाळी लावुया टिळा.

नाही विसरलो बलिदानाची
किती मोजली किंमत,
सीमा लांघुन घुसता कोणी
दावू त्याला हिंमत.

प्रांत वेगळे, वेश वेगळे,
प्रेमबंध जुळलेले,
संकटकाळी एकजुटीने
हात हाती धरलेले.

भाषा बोलू विविध तरीही
देशभक्ती ही वाणी,
त्या वाणीतुन गाऊ आम्ही
भारतभूची गाणी.

अहिंसा जरी धर्म आमचा
शांतिमंत्र जपलेला.
हृदयी स्वातंत्र्याची अखंड
धगधगणारी ज्वाला.

कला-क्रिडा-विज्ञान असू दे
दौड करू चौफेर,
'भारतभूचा जगात लौकिक'
जीवनाचे हे सार.


फडकत ठेवू नभी तिरंगा
शपथ अम्हा मातीची,
निळ्या नभाच्या भाळी रेखू
ज्योत नव्या दीपाची

-डॉ.सुमन नवलकर

*

## माझ्या वडिलांचे सन्मान पत्र

-विश्वास अजिंक्य


महाराष्ट्र शासन

सन्मान पत्र

श्री. नारायण आनंदराव अजिंक्य यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

'सविनय कायदे भंग' म्हणून ओळखले जाणारे जनआंदोलन १९३० साली सुरू झाले. मीठाचे कायदे, जंगल कायदे यासारखे अन्याय कायदे तोडण्याचा या आंदोलनाचा हेतू होता. गांधीजींनी कायदेभंगासाठी भारतीयांना आवाहन केले. माझे वडील त्यावेळी मॅट्रीकला होते. त्यांनी शाळा सोडून इंग्रजांच्या जुलमी कारभाराच्या विरोधात नाशिकला जंगल सत्याग्रहात भाग घेतला. तेव्हा इंग्रज शिपायांनी कठोरपणे लाठीमार करून सर्व आंदोलकांना झोडपून काढले व पकडले. आणि माझ्या वडिलांना ४ महिने कारावासाची शिक्षा झाली. त्यावेळी ते फक्त १९ वर्षांचे होते. माझे वडील सांगायचे की, तुरूंगात असतानासुद्धा इंग्रज शिपाई आंदोलनात भाग घेतलेल्या कैद्यांना क्षुल्लक कारणांवरून बेदम मारहाण करीत असत.



## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

∗ कै. श्री. आनंद शामराव तळपदे (२७-४-२०२१ निधन) यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नी श्रुता, पुत्र यश, कन्या सौ. पूजा कोठारे, स्नुषा सौ. आदिती, जामात श्री. मंदार कोठारे, नातवंडे यथार्थ आणि कायरा यांजकडून रु. ५००१/-

∗ श्री. अनिल रवींद्र तळपदे यांजकडून श्रीमती कस्तुर रवींद्र तळपदे आणि श्री. रवींद्र मोरेश्वर तळपदे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ रु. २५०१/-

∗ सौ. नीमा आणि जयपाल नवलकर यांजकडून जयपाल यांचे धाकटे बंधु श्री. मिलींद जयवंत नवलकर यांच्या स्मरणार्थ रु. २०००/-

∗ श्री. रमेश गजानन जयकर यांच्या १० वर्षांच्या ६-६-२०२१ पुण्यातिथीनिमित्त श्रीमती मीना रमेश जयकर आणि परिवाराकडून रु. १०००/-

∗ दिनांक १३-–२१, नागपंचमी रोजी खार येथील 'यशवंत' घराला (बंगल्याला) नव्वद वर्षे पूर्ण झाली. त्या प्रीत्यर्थ त्या घराचे मालक श्री. अजित इंद्रसेन नवलकर यांजकडून प्रभुतरुणास देणगी रु. ९००/-

***चुकीची दुरुस्ती***

शीला नवलकर यांच्या गतांकी देणगी सदरातील त्यांची वाढदिवसाची तारीख कृपया २२ जुलै अशी वाचावी.

## अभिनंदन

∗ ३१ जुलैच्या 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुरवणीत 'मेमरी कार्ड' सदरात नाटक, कादंबरी, वेपसीरिज, मालिका संवाद असे विविध प्रकारचे लेखन करणाऱ्या आणि मालिका, नाटक, चित्रपटांत अभिनयाचा स्वतंत्र ठसा उमटविणाऱ्या शिल्पा नवलकर यांचे यासंदर्भात विस्तृत मनोगत प्रसिद्ध झाले.

∗ 'ओटीटी वर' 'सिटी ऑफ ड्रीम्स' या वेबसीरीजचा दुसरा सीझन प्रदर्शित झाला. त्यात आदिनाथ कोठारे यांचा सशक्त अभिनय आहे. मोहन आरवले ही त्यांची भूमिका लोकप्रिय होतेय. त्याचीही दखल महाराष्ट्र टाइम्सने विशेषत्वाने घेतली. निवृत्त न्यायाधीश सौ. बागेश्री परीख यांचे ऑनलाईन व्याख्यान झाले.

∗ महाराष्ट्र दिनमान, ठाणे आवृत्तीत आमच्या सदर लेखिका सौ. गीता आंबवणे यांच्यावर डॉ. अरुंधती भालेराव यांनी विस्तृत लेख लिहिला आहे. ज्येष्ठ नागरिक, ठाणे या संस्थेच्या त्या पदाधिकारी, भिवंडीमधील समाजसेविका असा त्यांचा परिचय या लेखात आहे.

∗ पाठारे प्रभु चॅरिटिझचे विश्वस्त श्री. अजित विजयकर यांची कन्या सौ. यशोदा क्रेन यांना हा २०२१ सालचा ' अ स्टार वुमन लॉयर' हा बहुमान देण्यात आला.

∗ श्री. स्वप्नील सुरेश नवलकर यांनी 'जे.एस. डब्ल्यू स्टीलतर्फे कारनेल विद्यापीठाचा नेतृत्व विकसनाचा ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम केला.

∗ सुहासिनी कीर्तिकर यांची अस्मिता वाहिनीवरील अमृत कलशमध्ये ना. सी. फडकेंवर दोन भागात दोन दिवस मुलाखत घेतली गेली.

(पान ४ कॉलम ४ वरून)

ह्यापुढेही अशीच अखंडपणे सुरू राहील ह्याची खात्री आहे.

सर्वात शेवटी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गणेशोत्सवांत दहा दिवस अत्यंत श्रद्धेने पूजलेल्या ह्या गणेशमूर्तिचे दहाव्या दिवशी व्यवस्थित विसर्जन केले जाते. प्रतिवर्षी नवीन गणेशमूर्ती घडविली जाते.

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

१५-०८-२१ कीवा अक्षय राजेश देसाई, ठाणे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०१-०७-२१ | श्री. प्रकाश रमाकांत दत्तात्रय नायक, | वय ७४, | मुंबई |
| २७-०७-२१ | सौ. मीना भूषण धुरंधर, | वय ५४, | विरार |
| ०६-०८-२१ | श्री. मिलींद जयवंत नवलकर, | वय ६४, | कोथरूड, पुणे |
| ०७-०८-२१ | श्री. राज शैलेश शंकर विजयकर, | वय ३१, | अंधेरी |
| ०९-०–२१ | श्री. उज्ज्वल माधवराव त्रिलोकेकर, | वय ७०, | पुष्करिणी, ठाकुरद्वार |
| १४-०८-२१ | डॉ. सौ. सुनंदा नीतिश कीर्तिकर, | वय ४८, | खार |
| २५-०८-२१ | श्री. दिलीप सुंदरराव तळपदे | वय ८७, | ग्रँट रोड |

(पान ३ कॉलम ४ वरून)

तुमचा सर्वांचा सहभाग यात असेलच. सुनील पवार, संजना कोठारे खूप खूप प्रयत्नशील आहेत प्रभुतरुणाला असे 'तरुण' करायला. रसिकहो क्रियाशील प्रतिसाद देणार नं? द्यालच. खात्री आहे.

यानंतर हा देखणा कार्यक्रम पुढे सरकला. सुश्मिता आणि मिथिल नवलकर, प्रेरित नायक, निशांत यांचा 'धतिंग धतिंग' नाच, 'घुंगरू टूट गये' पर्यंत आवेशात पोचला. संजय परब यांचे 'लिखे जो खत तुझे' गाणे दिलखेचक झाले. आसावरी धुरंधर यांचे गाणे तर आपल्या कानांना मेजवानीच. 'सुलग सुलग जाये' म्हणत त्यांनी परभांच्या मनांत आतवर आग लावली स्वरांची. अप्रतिम!

पर्जन्य कीर्तिकर या छोट्या मुलाचा बालस्वर जेव्हा 'ये शाम मस्तानी' म्हणत घुमला तेव्हा आपली शाम मस्तानीच झाली. मध्येच 'याड लागले', 'चुपके चुपके', अखियों को गोली मारो' म्हणत कश्मिरा व्यवहारकरने नृत्यगोली थेट मारली रसिक हृदयांत. अधूनमधून निवेदिका-मोनिका वेबसाईटवर रक्षाबंधनाचे फोटो पाठवण्याचे आवाहन करीतच होती. दोन 'शॉर्ट फिल्म' मध्ये काम केलेल्या राहुल राणे याने 'तू भी चलो,' म्हणत या कार्यक्रमाची गाडी 'चलती रहे' असे वाटायला लावले.

कार्यक्रमाचा शेवट जसजसा येत होता तसतशी रंगत वाढतच चालली होती. टोरँटोहून सुदेश कोठारे हिरवीगार बाग पार्श्वभूमीला घेत 'नीले नीले अंबर' गाण्यातून दाखविता झाला. रवीन्द्र मानकरांचे प्रभुतरुणाशी असलेले ऋणानुबंध असे तसे संपणारे आहेत का? नाहीच. त्यांची नात डॉ. मोनिका आणि आशिका पुष्पल विजयकर यांनी अतिशय नेत्रसुखद असा 'मोहे रंग दो लाल' आणि 'मरोडी कलाई मोरी' वर कथ्थक नृत्य सादर केले. निष्का, मयूरा, सुश्मिता या त्रयींनी, 'रघुवीर तेरे राहन निहारे' हा नाचही पाठोपाठ बहारदार केला. या नयनमनोहर दृश्यांवर कर्णमधुर गाण्यांचा वळसा होता तो अश्विनी सूर्या कोठारे आणि सीमित सुभाष देसाई यांच्या लय, सादरीकरण, स्वर असा मिलाफ असणाऱ्या गाण्यांचा. अश्विनीचे 'ओऽऽप्यार दो' आणि सीमितचे 'बदनपे सितारे लपेटे हुअे' शम्मी कपूर, महमद रफी समोर साकारून गेले. तर त्यावरही मात केली ती वर्षा धराधरने गोड आवाजात, 'काळी पाच' लावत गायलेल्या 'आ, जाने जा' या गाण्याने. किती किती वर्णावे? किती किती वाखाणावे? शेवट गाठणारे पुढचे तीन कार्यक्रम अप्रतिमच. रसिकहो, तुमच्या मनांत गुंजत असतीलच. 'यह शाम मस्तानी' वाटली ना तुम्हाला या कार्यक्रमामुळे? प्रणिता प्रभाकरांना हा सर्व 'आनंद सोहळा' वाटला तर त्यात नवल ते काय? प्रतिक्रियांवर प्रतिक्रिया येत आहेत. आमचा हुरूप वाढवीत आहेत. हा आनंद देणारा-घेणारा क्रिया प्रतिक्रियांचा सागर असाच सदैव उचंबळत रहाणार आहे. दोन वर्षांनी शतकमहोत्सवी वाढदिवस साजरा करायला त्यातूनच तर बळ मिळणार आहे. आपण मनापासून तोवर म्हणत राहू या - 'या सुखांनो, या'!

## परीक्षेतील सुयश

**एसवायबीए (इंटरनॅशनल हॉस्पिटॅलिटी ॲण्ड टूरिझम मॅनेजमेंट) युनिव्हर्सिटी यु. के.**

श्री. राज सूर्यसेन देसाई ७५.७३ %

**बारावी आर्टस्**

कु. आरती जयेश कोठारे ९५ %
कु. नीष्का दीपक संजना कोठारे ७४.६७ %

**बारावी विज्ञान**

कु. श्रिया कौशिक जयकर ९० %
कु. आलीश निकोलाय कीर्तिकर ९४.९० % (४६७.०५/५००)

**बारावी - एचएससी (कॉमर्स)**

श्री. आर्य समीत रसिक विजयकर ७५ %

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67